## संयुक्त आदेश निशाणी ३४ व १ वर विशेष दिवाणी दावा क्र. ५१३/२०२३

सदरचे प्रकरण युक्तीवादाकामी प्रलंबित आहे. यापूर्वी माझे पूर्व अधिकारी यांनी निशाणी ३४ वर मुद्दे निश्चित केलेले आहेत. त्या मुददयाचे अवलोकन केले असता दावा हा विनिर्दिष्ट अनुतोष मिळणेकामी दाखल केलेला आहे. त्या अनुषंगाने वादी ज्याप्रकारे विनिर्दिष्ट अनुतोष मागत आहे त्यासाठी तो सदर वादातीत करारापासून आज पर्यंत तयार होता किंवा कसे याबाबतीत मुददा निश्चित करणे अत्यंत आवश्यक वाटते. त्याकामी " वादी हे सिध्द करतो काय की करारानुसार वादी खरेदीखत करुन घेण्यास तयार होता व आहे ? " हा मुददा काढणे उचित वाटते. त्याचवेळी वादीने दाव्यामध्ये त्यांची वैकल्पीक मागणी सुध्दा केलेली आहे. त्या वैकल्पीक मागणीच्या अनुषंगाने मुददा काढणे आवश्यक आहे. त्याकामी "वादी वैकल्पीक मागणीप्रमाणे व्याजासह रक्कम मिळणेस पात्र आहे काय? " सदर मुददयाच्या अनुषंगाने उभय पक्षकारांना काही पुरावा देणे असल्यास त्यांनी पुढील तारखेपर्यंत पुरावा दाखल करणेकामी संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

### आदेश

| | | |
|---|---|---|
| १. | ८(अ) | वादी हे सिध्द करतो काय की करारानुसार वादी खरेदीखत करुन घेण्यास तयार होता व आहे ? |
| २. | ८(ब) | वादी वैकल्पीक मागणीप्रमाणे व्याजासह रक्कम मिळणेस पात्र आहे काय? |
| ३. | | वादी प्रतिवादींना नवीन मुदयाच्या अनुषंगाने पुरावा देणेकामी संधी देण्यात येत आहे. |
| ४. | | नवीन समाविष्ट केलेल्या मुददयांपैकी मुददा क्र.१ हा पूर्वीच्या निशाणी ३४ वरती गठीत केलेल्या मुददयामध्ये मुददा क्र.८अ म्हणून तर मुददा क्र.२ हा मुददा क्र.८ब म्हणून दर्शविण्यात यावा. |
| ५. | | उभय पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी. |

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2026.04.07 13:19:34 +0530

स्थळ – करमाळा
दिनांक – ०७.०४.२०२६

( संजय मो. घुगे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, करमाळा